दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

मुख्य संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप |
उपसंपादक : अमोल सुर्यवंशी | उप संपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे

बीड महाराष्ट्र | शनिवार | 20 डिसेंबर 2025 |
| अंक क्र. 214 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

कुठेही काही अनुचित प्रकार, घडल्यास बातमीसाठी आणि व्हिडिओ पाठविण्यासाठी आम्हाला संपर्क करा : आपले नाव गुपित ठेवले जाईल

मो 8421577797

# बीडमध्ये गुन्हेगारांची झोप उडवणारे डॅशिंग पोलिस अधीक्षक नवनीत काँवत !

## एलसीबीने आठ दिवसांत रोड राबरी करणाऱ्या तीन टोळ्यांचा पर्दाफाश करून १२ आरोपी केले गजाआड





## एसपी काँवत यांच्या धडाकेबाज कारवाईने तीन टोळ्या उद्ध्वस्त

**बीड | प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात गुन्हेगारीचे प्रमाण वाढत असताना, जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या धडाकेबाज पोलिसिंगमुळे गुन्हेगारांच्या उरात धडकी भरली आहे. विशेषतः रोड राबरी, जबरी चोरी आणि दरोड्यांच्या घटनांमध्ये सहभागी असलेल्या टोळ्यांविरोधात पोलिसांनी आक्रमक कारवाई सुरू केली आहे.

गेल्या आठ दिवसांत स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) रोड राबरी करणाऱ्या तीन टोळ्यांचा पर्दाफाश करत १२ आरोपींना अटक केली आहे. या कारवाईमुळे जिल्ह्यातील गुन्हेगारीला मोठा आळा बसला आहे.

एलसीबीचे पथक बीड–सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर गस्त घालत असताना, संशयास्पद हालचाली आढळून आल्या. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून आरोपींना ताब्यात घेतले. चौकशीत आरोपींनी रोड राबरी, जबरी चोरी व दरोड्यांचे गुन्हे केल्याची कबुली दिली आहे.

पोलीस तपासात असेही समोर आले की, आरोपी महामार्गावरून जाणाऱ्या वाहनचालकांना थांबवून लुटमार करत होते. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पोलिसांनी रात्रगस्त वाढवली असून, गुन्हेगारांविरोधात कठोर कारवाईचा इशारा दिला आहे.

एसपी नवनीत काँवत यांच्या मार्गदर्शनाखाली बीड पोलिसांनी केलेली ही कामगिरी कौतुकास्पद ठरत असून, सामान्य नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. आगामी काळातही गुन्हेगारीविरोधात अशीच आक्रमक आणि सातत्यपूर्ण मोहीम राबवली जाईल, असा विश्वास पोलिसांकडून व्यक्त करण्यात आला आहे.



# परळी औष्णिक विद्युत केंद्रात चोरट्यांचा धुमाकूळ

## दुचाकी–ऑटोसह घुसखोरी, सुरक्षेवर गंभीर प्रश्नचिन्ह

**परळी | प्रतिनिधी**

परळीतील नवीन औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रात चोरट्यांनी थेट दुचाकी आणि ऑटो रिक्षासह घुसखोरी केल्याची धक्कादायक घटना समोर आली असून, या प्रकारामुळे अत्यंत संवेदनशील मानल्या जाणाऱ्या विद्युत केंद्राच्या सुरक्षेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

विद्युत केंद्रातील कुलिंग टॉवर ते मेटकॉन टॉवर परिसरातून स्क्रॅप साहित्य चोरी करून नेत असताना कंपनीच्या सुरक्षा रक्षकांनी एका तरुणाला रंगेहात पकडले. वैभव मोठे असे पकडण्यात आलेल्या तरुणाचे नाव असून, त्याच्यासोबत असलेले अन्य चार जण घटनास्थळावरून पसार झाले आहेत. या प्रकरणी पाच जणांविरुद्ध परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रात प्रवेशासाठी गेट पास अनिवार्य असतो आणि प्रत्येक व्यक्तीची कठोर झाडाझडती घेऊनच प्रवेश दिला जातो. असे असतानाही दुचाकी आणि ऑटो रिक्षासह चोरटे आत कसे पोहोचले? सुरक्षा यंत्रणा नेमकी कुठे अपयशी ठरली, याबाबत आता जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

दरम्यान, चोरीसाठी वापरलेली मोटार सायकल व ऑटो रिक्षा जप्त करण्यात आली असून, फरार आरोपींचा पोलिसांकडून कसून शोध सुरू आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली असून, औष्णिक विद्युत केंद्राच्या सुरक्षाव्यवस्थेची तातडीने पुनर्रचना करण्याची मागणी होत आहे.

# वेळ अमावस्या उत्साहात साजरी

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

तालुक्यात वेळ अमावस्या मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शेतकरी बांधवांसह शहरातील नागरिक स्नेह भोजनासाठी शेतात आले होते. बच्चे कंपनीने शेतात खेळण्याबरोबर वनभोजनाचा आनंद घेतला.

तालुक्यात वेळ अमावस्या दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी शुक्रवारी (ता.१९) उत्साहात साजरी करण्यात आली. सकाळपासूनच शेतकरी बांधव वेळ अमावस्या साजरी करण्यासाठी बैलगाडी तसेच अँटोने आपापल्या शेतात पोहचून स्नेह भोजनाची व्यवस्था करण्यात आली. दुपारी १२ नंतर ज्वारीच्या शेतात पांडवांची पुजा करून नैवेद्य दाखवून मित्रमंडळी, कुटूंबासह स्नेह भोजनाचा कार्यक्रम झाला. भोजनासाठी आंबील, घुगऱ्यासह कांदा, भज्जी व विशेष पदार्थ तयार करण्यात आले होते. शहरातील नागरिकांनी, मित्रमंडळांनी यावर ताव मारला. यानिमित्ताने बच्चेकंपनीने बोरे, तुरीच्या शेंगा, ऊस, हरभऱ्याचे डहाळे, वनभोजनाचा आनंद लुटला.



### वेळ अमावस्येचे महत्त्व....

वेळ अमावस्या म्हणलं की शेतकऱ्यांसाठी काळ्या आईच्या पुजेचा सण या सणाला ग्रामीण भागात मोलाचे स्थान आहे. वेळ अमावस्या म्हणल की लहान मुलं, महिला, पुरुष सर्वासाठी एकत्र येऊन शेतशिवारात जाऊन आनंदात पांडवांची पूजा करून साजरा करण्याचा दिवस असतो. मुळ कर्नाटकातील असणारा सण महाराष्ट्रातील उस्मानाबाद, सोलापूर, लातूर,बीड जिल्ह्यासोबत शेजारील तालुक्यांमध्ये मार्गशीर्ष अमावस्या म्हणजेच वेळ अमावस्या मोठ्या उत्साहाने साजरी केली जाते. ही आमावस्या दर्शवेळा अमावस्या म्हणूनही ओळखली जाते. मूळ कानडी शब्द “येळ्ळ अमावस्या” म्हणजे पेरणीनंतर येणारी सातवी अमावस्या म्हणजे येळी अमावस्या, याचाच अपभ्रंश होऊन वेळ अमावस्या शब्द रुढ झाला. या दिवशी सकाळी लवकरच शेतकरी आपल्या घरपरिवारासह शेताकडे जातात. अगोदरच्या दिवशी कडब्यापासून तयार केलेल्या कोपीमध्ये शेतीत असणाऱ्या सर्व पिकांची व मातीपासून बनवलेल्या पांडवांची [पंचमहाभूते] पुजा करतात. तर एक व्यक्ती एका रंगविलेल्या माठामध्ये अंबिल भरून त्याचा गावातील ग्रामदेवतेस नैवेद्य दाखवून शेतात कोपीवर आणले जाते. ज्वारी व बाजरीचे उंडे, आंबट भात, सर्व भाज्यांपासून तयार केलेली “भज्जी”, खीर, आंबिल असे एक ना अनेक पदार्थांचा नैवेद्य केला जातो. बनविलेल्या सर्व पदार्थांचा प्रसाद म्हणून वनभोजनाच्या रुपात आस्वाद घेतात. 'सणानिमीत्त एकमेकांना जेवण्यासाठी आमंत्रणे दिली जातात. ज्यांना शेती नाही अशांना आवर्जुन जेवायला शेतात बोलावले जाते. शहरी भागातील लोकांसाठी तर हा सण म्हणजे पर्वणी असतो. या दिवशी उस्मानाबाद व लातूर शहरात तर अघोषित संचारबंदीच असते. शहरे ओस व खेडी माणसांनी व आनंदाने हर्षोल्हासीत झालेली असतात.

एकंदरीत विचार करता इतर सणांमध्ये आढळणारी निसर्गाची हानी या सणांत नाही! याउलट माणसाला निसर्गाजवळ घेऊन जाऊन त्याचे निसर्गाशी घट्ट नाते विणणारा हा सण ! रंगीत फुलांच्या मुकुटासह नटलेला करडा, कापणीसाठी आलेली तूर, परिपक्व होऊ लागलेला हरभरा, हवेच्या तालावर नाचणारा गहू, पाखरांना खुणावणारी पोटऱ्यातील ज्वारी असा चोहीकडे दिसणारा हिरवागार आणि प्रसन्न निसर्ग! अशा वातावरणात ऊन, वारा, पाऊस या निसर्ग शक्तींसमोर नतमस्तक होऊन केलेली ही पुजा म्हणजे शेतकरी व निसर्गाची शतकानुशतके चालत आलेली भागीदारीच दर्शविते. अमावस्येनिमित्त खाण्याची जणू मेजवानीच असते. आंबील, गव्हाची खीर, भज्जी, धपाटे, शेंगा चटणी, वरण अशा विविध प्रकारचा मेनू असतो. त्यामुळे एरव्ही शेतीकडे बगल देणारी माणसे सगळीकडे हिरवेगार बागायत असल्याने शेतीची वारी करू लागले आहेत. गेल्या अनेक वर्षापासूनची परंपरा मराठवाड्यातील लातूर, उस्मानाबाद, परळी, सोलापूर भागातील शेतकऱ्यांनी जोपासली आहे.